दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २४६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महापालिकेची कामोठे आणि घोटगाव येथे मोठी धडक कारवाई



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्या आदेशान्वये आज महापालिका कार्यक्षेत्रातील कामोठे आणि घोटगाव येथील अनधिकृत बांधकामांवर मोठी धडक कारवाई करण्यात आली.

गेल्या काही काळापासून महापालिका क्षेत्रातील घोट गाव येथे अनधिकृत बांधकामांमध्ये वाढ होताना दिसत असल्याने आयुक्तांच्या ओदशानूसार ,उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज मोठी धडक कारवाई करून अनधिकृत बांधकामे निष्कांसित करण्यात आली. यामध्ये दोन घरे, नऊ दुकाने जमीन दोस्त करण्यात आले. जेसीबी तसेच मोठा पोलिस फौज फाटा सहीत ही कारवाई करण्यात आली.

यावेळी सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, प्रभाग समिती ‘अ’ चे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे , प्रभाग ‘अ’ चे सर्व स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

तसेच कामोठे येथील सेक्टर १८,२२,३५,३६ येथील अनधिकृत झोपड्या, अनधिकृत टपाऱ्या यांच्यावर मोठी धडक कारवाई करण्यात आली. जेसीबी, पोलिस फौज फाटा सहीत सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, अतिक्रमण पथक प्रमुख व दोन्ही शिफ्ट चे कर्मचारी, पोलीस कर्मचारी व प्रभाग कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते सदर कारवाई सकाळी ११ वाजता चालू केले असून सायंकाळी ५ पर्यंत चालू होती.

खांदेश्वर स्टेशन समोरील खाली प्लॉट येथे झोपडपट्टी व नर्सरी जेसीबीद्वारे पाडण्याचे काम करण्यात आले. किया शोरूम भूमी लँडमार्क सोसायटी समोरील मोकळ्या प्लॉटमध्ये पान शॉप व इतर दुकाने झोपडे जेसीबीद्वारे पाडण्याचे काम करण्यात आले. सेक्टर २२ सिडको मार्केट येथील वडापाव दुकाने ,चायनीज गाडी ,भाजीपाला दुकाने अतिक्रमण कारवाईमध्ये जेसीबीद्वारे तोडण्यात आले. उरण एक्सप्रेस हायवे हावरे निर्मिती .../२

# मालमत्ता करामध्ये नागरिकांना दिलासा देण्यास सत्ताधाऱ्यांची उदासिनता : प्रितम म्हात्रे

## पालिकेला एलबिटी माफ करण्यास जमते मात्र मालमत्ता कर नाही

## महाविकास आघाडीच्या नगरसेवकांचा सभात्याग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल महापालिकेच्या नव्याने बनविण्यात आलेल्या बजेटमध्ये एलबीटी माफ करण्याचा निर्णय घेवून पनवेल पालिका क्षेत्रातील नागरिकांच्या तोंडात मारण्यासारखा प्रकार पनवेल महानगरपालिकेच्या सत्ताधारी पक्षाने केला आहे. या बजेटविरोधात महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी एकत्र येवून महासभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकून सभात्याग केला. नागरिकांना दिलासा देणाऱ्या मालमत्ता कराबाबत पनवेल महानगरपालिका सत्ताधारी उदासीनता दाखवित असल्यामुळे अखेर महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी सभात्याग करून याबाबत पत्रकार परिषदेत सत्ताधारी पक्षाचे मनमानी धोरण कसे चालले आहे, याबाबत खंत व्यक्त केली.**



एका बाजूला मालमत्ता करासाठी नागरीक रस्त्यावर उतरत आहेत तर दुसऱ्या बाजूला नागरिकांच्या मागण्यांना केराची टोपली दाखवित व्यावसायिकांना एलबीटी माफ करण्याचा घाट पलिकेमार्फत घालण्यात आला. मात्र यापुढे नागरिकांसाठी आम्ही महाविकास आघाडीचे नगरसेवक रस्त्यावर उतरून मालमत्ता कर ७० टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी तसेच कोरोना काळातील मालमत्ता कर माफ करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून यासाठी लवकरच रस्त्यावर उतरून पालिका सत्ताधाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा निषेध नोंदविणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

आयोजित पत्रकार परिषदेला पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस तथा नगरसेवक गणेश कडू, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक सतीश पाटील, नगरसेवक रविंद्र भगत, नगरसेविका सुरेखा मोहोकर, नगरसेविका प्रीती जॉर्ज, नगरसेविका सारिका भगत आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार परिषदेत मालमत्ता कर हा विषय जरी अजेंड्यावर असला तरी या अनुषंगाने गेली कित्येक वर्षे पालिका हद्दीतील रखडेलेली विकास कामे, रस्त्यांच्या कामातील भ्रष्टाचार आदी विषयांवर मोठ्या प्रमाणावर वक्तव्य करण्यात आली.

एप्रिल २०२२ मध्ये पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेवकांची मुदत संपत असल्यामुळे अवघ्या ६ महिन्यांच्या आत निवडणुका लागण्याची शक्यता आहे. आणि त्यातच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार स्थानिक भाजपा सत्ताधाऱ्यांनी केला असल्यामुळे येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपला पालिकेवर पुन्हा आपली सत्ता काबीज करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. मात्र भाजपकडून जर नागरिकांच्या मालमत्ता कराचा विषय सोडविण्यात आला तर विरोधी पक्षदेखील सत्ताधाऱ्यांचे अभिनंदन करेल, अशा स्वरूपात सत्ताधाऱ्यांना एक प्रकारे महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी चपराक लगावली आहे.

# देवाशीष चक्रवर्ती राज्याचे नवे मुख्य सचिव

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे आज आपल्या पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव देवाशीष चक्रवर्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंटे यांचा कार्यकाळ आज संपत असल्याने त्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं केंद्राकडे पाठवला होता. मात्र, केंद्रानं हा प्रस्ताव फेटाळल्यामुळे सीताराम कुंटे राज्याच्या मुख्य सचिव पदावरुन आज निवृत्त झाले. चक्रवर्ती यांनी आज राज्याच्या मुख्य सचिवपदाचा पदभार स्वीकारला.



राज्य सरकारने सीताराम कुंटे यांना तीन महिने मुदतवाढ देण्याचा केंद्र सरकारकडे पाठवला होता. मात्र, आज शेवटच्या दिवशी संध्याकाळपर्यंतही राज्य सरकारचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला नाही. .../२

## संक्षिप्त...

### समीर वानखेडेंची राज्य सरकारच्या जात पडताळणी समितीकडून चौकशी होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एनसीबीचे विभागीय संचालक समीर वानखेडे यांची महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे खोटे जात प्रमाणपत्र असल्याची तक्रार एका तक्रारदारकाडून करण्यात आली आहे. यासंदर्भात आज तक्रारदाराला समितीने कागदपत्रे घेऊन कार्यालयात बोलविले होते. त्यानुसार, तक्रारदार अशोक कांबळे यांचे वकील हे कागदपत्रे घेऊन कार्यालयात पोहोचले होते. तक्रारदाराने कागदपत्र सादर केली, त्यानुसार प्रथम दर्शनीय समितीने या तक्रारीची गंभीर दखल घेत तक्रारदार व समीर वानखेडे या दोघांनाही पुढील चौकशीसाठी बोल-ावले आहे.

सामाजिक कार्यकर्ता अशोक कांबळे यांनी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांचा जात प्रमाणपत्र खोटे असल्याची तक्रार केली आहे व त्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यानुसार आज अशोक कांबळे यांच्या वकिलांनी कागदपत्रे समितीला सादर केली. तक्रारदार अशोक कांबळे यांचे वकील नितीन सातपुते हे जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात आज उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व कागदपत्रे समितीला दिल्याचे सांगितले. तसेच, प्रथम दर्शनी समितीने कागदपत्रे पाहून चौकशी करण्याचे मान्य केले. त्यानुसार पुढील १४ डिसेंबरला समीर वानखेडे यांना कार्यलयात बोलावून कागदपत्रे सादर करण्याचे आदेश देऊ, असे समितीने सांगितल्याचे वकील सातपुते यांनी सांगितले. याचबरोबर, आम्ही दिलेल्या तक्रारीनुसार कागदपत्रे जर खोटी आढळली तर त्यांच्यावर कारवाई होऊन त्यांची नोकरी देखील जाईल, असेही सातपुते यांनी म्हटले आहे.

# पनवेलमध्ये लालपरीला पर्याय काळी पिवळी



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

राज्यभर सुरू असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे पनवेल आगार पूर्णपणे ठप्प झाला आहे. पनवेल आगारातील अध्याप पर्यंत २७ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. प्रवाशांचे हाल होऊ नयेत म्हणून प्रशासनाने लाल परीला पर्याय म्हणून काळी पिवळी गाड्या बस आगाराच्या बाहेर तैनात केल्या आ-हेत. काळी-पिवळी समवेत बेस्ट बसेस पनवेल आगारांमध्ये जाऊनन प्रवाशांना दिलासा देण्याचे काम करीत आहेत. मात्र गजबजलेल्या पनवेल आगारांमध्ये स्मशान शांतता पसरली असल्याचेही दिसून येत आहे.

एसटी कर्मचाऱ्यांचे विलिनीकरण करावे या मागणीसाठी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल पनवेल आगारातील २७ कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई केली आहे. असे असले तरी मंगलवार पर्यंत आगरातून एकही गाडी सुटलेली नाही. एसटी कर्मचाऱ्यांचे विलिनीकरण करावे या मागणीसाठी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनामुळे परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी कर्मचाऱ्यांचे शासनात विलिनीकरण .../२

# शिक्षकाने केला अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील ग. बा. वडेर हायस्कुलमध्ये इयत्ता सातवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा शाळेतील जेष्ठ शिक्षकाने परीक्षा सुरू असतांनाच सोमवारी (ता.२९) विनयभंग केला आहे. याआधी देखील या शिक्षकाने मुलीचा विनयभंग केला असल्याचे तक्रारीत म्हंटले आहे. मंगळवारी (ता.३०) सायंकाळी या शिक्षकावर पाली पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की या मुलीचा गणित विषयाचा पेपर चालू असतांना गुलाब एकनाथ पाटील (वय.५७) या ज्येष्ठ शिक्षकाने तिचा विनयभंग केला. या आधी देखील त्याने असा प्रकार केला असल्याने मुलीच्या नातेवाईकांनी या शिक्षिका विरोधात पाली पोलिस स्थानकात तक्रार दाखल केली. त्यानुसार पाली पोलीस ठाणे कॉ. गुन्हा रजिस्टर नंबर १२०/२०२१ भा. द. वि. सं. कलम ३५४ (अ)(१) सह .../२

# रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे करण्यात येणारे टँकर हटवा : बबन पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन दिवसापूर्वी तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये एका मोटार सायकलला अपघात होवून त्यात तीन जणांचा नाहक जीव गेला आहे. सदर अपघात टाळण्यासाठी तळोजा औद्योगिक वसाहतीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे करण्यात येणारे टँकर हटवावे अशा मागणीचे पत्र शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे.



तळोजा औद्योगिक वसाहतीच्या बाजूला नुकताच मोठा अपघात झाला. असे अपघात त्या भागात वारंवार घडत असतात. हे अपघात दिपक फर्टीलायझर कंपनीच्या जवळ असलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला टँकर उभे करण्यात येत असल्यामुळे घडतात. तरी अशा अपघातांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून रस्त्यावर उभे असणारे टँकर कंपनीने एका ठिकाणी पार्कींग करून लावावेत, तशा वाहतूक शाखेने आवश्यक त्या सुचना द्याव्यात. जेणेकरून हे अपघात टाळता येतील.

अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरुन या विरोधात आंदोलन छेडेल असा इशारा जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी दिला.

# चिरनेर बेलडोंगरी येथे लागलेली आग विझविण्यात यश

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर येथील बेलडोंगरी परिसरात काही समाज कंटकांकडून लागलेली आग विझविण्यात निसर्गासाठी काम करणारी वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांना यश आले आहे. डोंगरांवरील गवत सुकल्या नंतर काही समाज कंटकांकडून डोंगरांना आगी लावण्याचे पातक सुरू झाले आहे. या आगी लावल्यामुळे निसर्गामधील निसर्ग संपदा नष्ट होत असून, अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती जाळून नष्ट केल्या जात आहेत.



झाडा झुडपात वास्तव्य करणाऱ्या पशु पक्षांची अंडी सरपटणारे प्राणी होरपळून जात आहेत.त्यांच्या जाती ही नष्ट होऊ लागल्या आहेत. मात्र निसर्गामध्ये काम करणाऱ्या संस्था त्यामध्ये वन्यजीव निसर्ग संरक्षण ह्या संस्थेमुळे अनेक प्राणी पक्षी साप वाचले आहेत. निसर्ग वाचला आहे.या परिसरात कोठेही आग लागली तर ते आपल्या जीवावर बेतून विझविण्याचे काम करतात. गेल्या वर्षी या संस्थेने कलम डोंगराला लागलेली आग सतत तीन दिवस आटोकिचे प्रयत्न करून विझवित होते.

या वर्षी वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेने जवळजवळ दोन हजार पेक्षा अधिक वृक्षे चिरनेर येथील बेलडोंगरी या ठिकाणी वन खात्याच्या परवानगीने लावली आहेत.त्याचे संवर्धन ही सुरू आहे मात्र काही समाज कंटकांकडून डोंगरांना आग लावण्याचे कृत्य केले जात आहे. आज लागलेली आग संस्थेच्या सदस्यकडून आणि आदिवासी बांधवाकडून विझविण्यात आली.

# तीन हजार कर्मचारी बडतर्फ? एसटी महामंडळाच्या कठोर कारवाईच्या हालचाली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भरघोस पगारवाढीनंतर एसटी कर्मचाऱ्यांनी संप कायम ठेवण्याचा ठाम निर्णय घेतल्याने अखेर महामंडळाने कठोर कारवाईच्या हालचाली सुरू केल्या आहेत. महामंडळात कायमस्वरूपी असलेल्या तीन हजार कर्मचाऱ्यांना बडतर्फीची नोटीस बजावण्यात येणार आहे.

एसटी फेऱ्या वेळापत्रकाप्रमाणे धावत्या ठेवण्यासाठी २००० प्रशिक्षणार्थींची महामंडळात नियुक्ती करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणार्थींचे ९० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. यामुळे अंतिम चाचणी घेऊन त्यांना नियुक्ती पत्र देण्यात येणार असल्याचे महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यात तीन हजार कर्मचाऱ्यांना महामंडळाने निलंबनाची नोटीस बजावली होती. या नोटिशीनंतर १५ दिवसांच्या आत संबंधित कर्मचाऱ्यांनी आपले म्हणणे मांडणे अपेक्षित होते. काही कर्मचाऱ्यांनी आपली बाजू मांडली तर काहींनी याकडे दुर्लक्ष केले. यामुळे शिस्त व आवेदन कार्यपद्धतीनुसार पुढील कार्यवाही सुरू करावी. पुढील कारवाई म्हणून महामंडळाकडून बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी, असे आदेश सोमवारी एसटी मुख्यालयातून सर्व विभाग नियंत्रकांना देण्यात आले आहे. बडतर्फीची नोटीस मिळाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने ७ दिवसांत उत्तर देणे अपेक्षित असते. या सात दिवसांत उत्तर दिले अथवा नाही तरी महामंडळ आदेश काढून संबंधितांना सेवेतून कायमचे काढून टाकू शकते, असा दावा महामंडळाकडून करण्यात आला आहे.



# नवकोटांचा नवोदय

करोनाचे मळभ अजून पुरते दूर झाले नसताना आणि या धोक्याची नवनवी वळणे समोर येत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या महिन्यातील 'मन की बात'ने एक आल्हाददायक वार्ता पुढे आली आहे. गेल्या दहा महिन्यांत जवळपास दर दहा दिवसांनी भारतात एक नवी 'युनिकॉर्न' उभी राहिल्याची ती बातमी आहे. 'युनिकॉर्न' ही संज्ञा एक बिलियन डॉलर इतके मूल्यांकन असणाऱ्या स्टार्ट-अपसाठी वापरली जाते. भारतीय चलनात हिशेब मांडायचा तर साधारण साडेसात हजार कोटी रुपये. 'युनिकॉर्न' हा कपाळावर ताकदवान शिंग असणारा प्राणी आहे. मात्र, तो खरा नाही. पावित्र्य आणि शक्ती असणारा हा पौराणिक प्राणी स्कॉटलंडचा राष्ट्रीय प्राणी आहे. आपल्या हिमतीवर, बुद्धिसंपदेच्या जोरावर आणि श्रमकौशल्यावर खासगी कंपनी उभारणारे उद्यमशील तरुण-तरुणी असतात. त्यांच्या कंपनीने एक बिलियन डॉलरचा पसारा उभा केला की, त्या कंपनीला 'युनिकॉर्न' अशी संज्ञा देण्याचा संकेत आहे. भारतीय तरुण-तरुणींनी करोना काळाची टांगती तलवार असताना इतके मोठे यश मिळविणे, ही अतिशय अभिमानास्पद आणि गौरवाची बाब आहे. केवळ साडेसात हजार कोटींचे मूल्यांकन असणाऱ्याच नव्हे तर त्याहून छोट्या असणाऱ्या असंख्य नवीन कंपन्याच भारताला करोनोत्तर काळात आर्थिक संकटातून बाहेर काढत आहेत. त्यांचे कौतुक म्हणजे भारताच्या उद्यमशीलतेचे कौतुक आहे. साधारणपणे पाच ते सहा वर्षांपूर्वी भारतात नऊ किंवा दहा युनिकॉर्न असाव्यात. मात्र, आज भारतात सत्तरहून अधिक युनिकॉर्न कंपन्या आहेत. याचा अर्थ, यातील प्रत्येक कंपनीचे मूल्यांकन साडेसात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. याहूनही अधिक मोलाची बाब म्हणजे, या कंपन्या अवघ्या काही वर्षांपूर्वी पहिल्या पिढीच्या उद्योजकांनी स्थापन केल्या आहेत. जगातल्या फेसबुक किंवा इतर अनेक कंपन्या या अशाच युनिकॉर्न आहेत. १९९१ मध्ये भारतात उदारीकरणाचे आरोग्यदायी वारे वाहू लागल्यामुळे हळूहळू उद्योजकांच्या वाटेवरचे काटे कमी होत गेले. प्रत्येक उद्योजक म्हणजे भांडवलदार आणि भांडवलदार म्हणजे समाजाचे शोषण करणारा समाजशत्रू, ही भावना भारतात आत्ताआत्तापर्यंत खोलवर रुजली होती. तशी ती रुजण्यात राजकीय शक्तींचे हितसंबंध होते. त्याचप्रमाणे, आपापल्या वैचारिक राहुट्या न सोडण्याचे व्रत घेतलेले पक्ष आणि संघटना या भारतातील नव्या उद्यमशीलतेला मारक ठरत होत्या. सुदैवाने, काँग्रेसने उदारीकरणाचा कार्यक्रम नरसिंह राव आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली राबविल्याने देशातील वातावरण बदलत गेले. त्या बदललेल्या वातावरणाची फळे म्हणजे पंतप्रधानांनी नमूद केलेले भारतीय युनिकॉर्नचे यश आहे. नवे उद्योग उभे करताना सर्वांत महत्त्वाची असते ती कल्पना आणि संकल्पना, असे म्हटले जाते. नव्या संकल्पनेच्या मागे भांडवल येतेच. गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांनी स्विगी, फ्लिपकार्ट, मिंत्रा, पेटीएम, स्नॅपडील, वेदान्तु, रिबेल फूड्स, अर्बन कंपनी, शेअरचॅट या व अशा असंख्य कंपन्या यशस्वी करून दाखविल्या आहेत. अर्थात, यशस्वी कंपन्यांचे प्रमाण सेवाक्षेत्रात अधिक आहे. या सेवाक्षेत्रातील कंपन्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे भक्कम पाठबळ आहे, हे विसरता कामा नये. त्याचप्रमाणे, भारतातील सर्व स्टार्ट अप आणि नंतर युनिकॉर्न कंपन्यांमध्ये सेवाक्षेत्राप्रमाणे उत्पादन करणाऱ्या कंपन्याही असणे आवश्यक आहे. भारतीय उद्योजक हेही आव्हान तितक्याच ताकदीने पेलतील, यात शंका नाही. करोनाकाळ सुरू झाल्यापासून जगभरातील अनेक सरकारांनी आपापली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी प्रचंड पैसा ओतला आहे. पैसा आता देशांच्या सीमा ओळखत नाही. तो जगभर विविध रुपांनी फिरत राहतो. हा जो वाढता पैसा जगाच्या अर्थकारणात आला आहे, त्यातील बराचसा भांडवलाच्या रूपात भारतीय कंपन्यांमध्ये आला आहे. मात्र, कोणताही गुंतवणूकदार निव्वळ स्वप्नांमध्ये पैसा गुंतवत नाही. त्यामुळे, भारतीय स्टार्ट अप कंपन्यांनी सर केलेले हे शिखर अधिकच मोलाचे आहे. युनिकॉर्न म्हणजे भांडवल व मूल्यांकनात मोठ्या ठरलेल्या कंपन्या क्षणभर बाजूल्या ठेवल्या तरी भारतात आज सुमारे साठ हजार स्टार्टअप कंपन्या यशस्वी ठरल्या आहेत. त्या छोट्या असल्या तरी तेच भारताच्या नव्या उद्यमशीलतेचे प्रतिबिंब आहे. मुख्य म्हणजे, यातल्या निदान दहा हजार कंपन्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या आहेत. युनिकॉर्न हे नवोदित उद्यमींनी गाठलेले शिखर असले तरी या कंपन्यांच्या खाली स्टार्ट अप कंपन्यांचा प्रचंड मोठा पाया आहे. या उद्यमशीलतेमुळे सामान्य भारतीय नागरिकांचे जीवन अधिक सोपे, अधिक सुखद आणि अधिक उत्पादक होणे, हा सर्वांत मोठा लाभ आहे. हे नवोद्योजक भारताच्या संपत्तीत भर टाकतानाच नवे रोजगार निर्माण करतील आणि विकृत भांडवलशाहीचे रूप भारतीय अर्थकारणाला येऊ देणार नाहीत. आता केंद्र आणि राज्य सरकारांनी नवोदित उद्योजकांच्या वाटा आणखी मोकळ्या केल्या तर आजचे हे चित्र येत्या काही वर्षांत नव्या उंचीवर गेल्यावाचून राहणार नाही.

# हृदयविकारावर प्रथमोपचाराने वाचवा जीव : डॉ. राजेश पाचारकर



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाणे व डॉ. राजेश पाचारकर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयविकार आणि प्रथमोपचार यावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले. या शिबिराला परिसरातील ग्रामस्थांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला.

सध्या धकाधकीच्या जीवनामुळे आपल्या आरोग्यकडे लक्ष देणं अनेकांना कठिण होत आहे. ही मोठी चिंतेची बाब आहे. परंतु, अशाच दुर्लक्षामुळे हृदयविकाराचा झटका आलेला देखील काही वेळा कळत नाही. केवळ छातीत दुखणं म्हणजे हार्ट अटॅक असू शकतो हे कुणाला खरं वाटत नाही. हृदयविकार नेमका कसा ओळखायचा इथपासून ते हृदयविकाराचे प्रकार, तुम्हाला हृदयविकार असल्यास काय करावेत? कशी काळजी घ्यावी? याबाबत बोर्लीपंचतन येथील रहिवासी डॉ. राजेश पाचारकर यांनी माहिती दिली.

श्रीवर्धन तालुक्यामधील सद्याच्या आरोग्य सुविधांसाठी शासकीय आरोग्य यंत्रणा नावापुरत्या उरल्या आहेत. तात्काळ उपचाराची गरज असताना शहरा ठिकाणी जावे लागते. त्यामुळे येथील नागरिकांना त्याचा नाहक त्रास जाणवतो. धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने हार्ट अटॅक अशा आजारामुळे ग्रामीण भागात मुत्युच्या घटनेत वाढ होताना दिसत आहेत. यासाठी आपल्या हातून इतरांचे जीव वाचवण्यासाठी व हा आजार टाळण्यासाठी दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सा. पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांच्या सहकार्याने बोर्लीपंचतन येथील रहिवासी डॉ. राजेश पाचारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाचारकर मित्र मंडळाकडून शिबीर घेण्यात आले.

डॉ. पाचारकर कामानिमित्त शहरात असतात. मात्र, गावी वैद्यकीय शिबिर, गरजू विद्यार्थ्यांना मदत, मार्गदर्शन शिबिर असे विद्यार्थी व रुग्णांसाठी विविध उपक्रम राबवत गेली दोन वर्षे मदतीचा हात देत समाजापुढे वेगळा आदर्श ठेवला आहे.

या शिबिराला चंद्रकांत धनावडे, सतीश रोटकर, शंकर गाणेकर, रत्नाकर पाटील, मकरंद जाधव, उद्देश वाघजे, प्रवीण मयेकर, गफूर साठविलकर इत्यादी मान्यवरांसह पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# कोलाड विभाग कुणबी युवक मंडळाचे अध्यक्षपदी संदेश लोखंडे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न रोहे तालुका कुणबी युवक मंडळ अंतर्गत कोलाड विभाग कुणबी युवक मंडळाचे अध्यक्षपदी संदेश लोखंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

तालुका कुणबी समाजाचे अध्यक्ष शिवरामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेप्रसंगी समाजाचे डॉ. सागर सानप, डॉ.मंगेश सानप,चंद्रकांत लोखंडे, मारूती मालुसरे, महेश ठाकूर, संजय सानप, देविदास सानप, मनोहर महाबळे, केशव महाबळे, विजय लोखंडे, चंद्रकांत ठाकूर, दामाजी कदम, दत्ताराम निवाते, विठोबा गोरिवले, बळीराम लोखंडे, अजय लोखंडे, संदीप मालुसरे आदी युवक समाजबांधव उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या मिळकतीच्या विद्यमान मालकीण ॲड.सौ.मीरा प्रमोद ठाकूर असून त्यांनी कायमस्वरुपी सदर मिळकत विकत घेतलेली असून ती पनवेल दुय्यम सह-निबंधक क्र.५ येथे नोंदणी दस्त क्र.३००७/२०१३ दिनांक १३ जून २०१३ राजी नोंदविलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**अगोदरचे मालक : श्री.सुनील लहू जुवाटकर**
**सध्याचे/ची मालक/मालकीण : ॲड.सौ.मीरा प्रमोद ठाकूर**
**जागेचे वर्णन : ए विंग सदनिका क्र.००३, बालाजी शरण को.हौ. सो.लि., सर्व्हे क्र.१४२, हिस्सा क्र.३ बी, आदई गाव, नवीन पनवेल-४१०२०६**

सदर मिळकतीचे 'शेअर सर्टीफिकेट' क्र.२६ ते ३० हे मिळकतीचे मुळ मालक श्री.मसु जे. माने यांच्या नावे दि.१५/०८/२००८ रोजी बिल्डरने म्हणजे मे.महादीप रियल्टी प्रा.लि.चे डायरेक्टर श्री.महेशकुमार नागराजन यांनी बालाजी शरण नावाने बनवलेल्या वरील प्रमाणे वर्णनाच्या सदनिकेसाठी दिलेले होते. त्यानंतर ते कुठेतरी गहाळ झाले व आज रोजी पर्यंत सापडलेले नाही.

सदर मिळकतींचा कोणताही भाग सौ.मीरा प्रमोद ठाकूर यांनी आजपर्यंत कोणासही विक्री, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, व्याज, पोटगी, बक्षिस वा अन्य कोणत्याही हेतूने कोणासही हस्तांतरीत केलेला नाही व त्यांना सदर मिळकत विकण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. तरीही सदर मिळकतीत कोणाचेही हितसंबंध वा हक्क असल्यास त्या व्यक्तीने तशी संबंधित हरकत अथवा तक्रार नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य ती कागदपत्रे पुराव्यासहीत सादर करावीत.

वरील मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकतीचे 'डुप्लिकेट शेअर सर्टीफिकेट' वरील सोसायटीच्या कमिटीकडे मागण्याचा अधिकार पूर्णतः ॲड.सौ.मीरा प्रमोद ठाकूर यांनाच असेल व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरले जाईल व मागाहून कोणाचीही हरकत अथवा तक्रार आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

**सही/-**
**ॲड.सौ.मीरा प्रमोद ठाकूर**
**सध्या रा.प्लॉट नं.१५, रोड नं.१३, सेक्टर १९,**
**नवीन पनवेल-४१०२०६**



## पनवेल महानगरपालिका

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

### झाडांना खिळे ठोकणे व विद्रुपीकरणास प्रतिबंध करणेबाबत जाहीर प्रकटन

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आले आहे. काही व्यावसायिक हे त्यांच्या व्यवसायाची जाहिरात व्हावी या हेतूने मुख्यत्वे रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना खिळे ठोकून जाहिरात लावतात. भिंतीपत्रके इ.द्वारे जाहिरात चिकटवतात. यामुळे झाडांना इजा पोहचते व शहराचे सौंदर्यास बाधा पोहोचून विद्रुपीकरण होते. याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर आवाहन करण्यात येते की, त्यांनी झाडावरील पोस्टर्स / भिंतीपत्रके व जाहिराती इ.साहित्य झाडावर खिळे लावून जाहिरात लावली असल्यास हे जाहीर आवाहन प्रसिद्ध झालेपासून तीन (३) दिवसांचे आत काढून घ्यावे. या कालावधीनंतर जाहिराती आढळून आल्यास, तसेच यापुढे झाडांना खिळे ठोकून, तसेच पोस्टर, भिंतीपत्रके व जाहिराती लावणाऱ्यांवर / संबंधितांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ अन्वये नजिकच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**सही/-**
**उपायुक्त-I (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.११/४६१/२०२१
दिनांक : ३०/११/२०२१


# बेपत्ता झालेल्या तीन तरुणींना पनवेल तालुका पोलिसांनी काढले शोधून



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वलप गाव परिसरातून तीन तरुणी ज्यामध्ये दोन अल्पवयीन व एक सज्ञान या राहत्या घरात कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्या होत्या. याबाबतची तक्रार त्यांच्या पालकांनी पनवेल तालुका पोलिसांना करताच अत्यंत शिताफीने व तांत्रिक तपासाच्या आधारे या तीनही मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले आहे.

सदर तीन मुली (०२ अल्पवयीन + ०१ सज्ञान ) या घरातून कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेल्या आहे. याबाबतची तक्रार दाखल होताच पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि रवींद्र दौंडकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक खेडकर यांनी केलेल्या सुचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर व महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अंधारे यांनी तात्काळ सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तांत्रिक तपास करून दोन मुलीना बदलापूर येथून व एका अल्पवयीन मुलीस ठाणे येथून ताब्यात घेतले.

त्यांच्याकडे चौकशी करता त्या तिघी जणी आपले वेगळे आयुष्य व आई-वडिलांचे कोणतेही बंधन नसावे याकरिता परस्पर घरातून निघून गेल्याचे त्यांनी मान्य केले. त्यांनी अविचाराने घेतलेल्या निर्णयामुळे त्यांच्याबाबतीत एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती अशा परिस्थितीत उपरोक्त अधिकारी व अंमलदार यांनी दाखवलेली समयसूचकता व तात्काळ केलेल्या तपासामुळे सदर तिन्ही मुलींचा यशस्वीरित्या शोध घेता आला व त्यांना त्यांच्या पालकाच्या ताब्यात सुखरूपपणे देता आले. यावेळी त्यांच्या पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते व सदर पालकांनी पनवेल तालुका पोलिसांचे मनापासून आभार मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## महापालिकेची कामोठे आणि घोटगाव येथे मोठी धडक कारवाई

सोसायटी जवळ गॅरेज धंदे यांचे शेड जेसीबी द्वारे पाडण्याचे काम करण्यात आले. सेक्टर २० सेंट्रल बँक समोरील मोकळ्या प्लॉटवर भंगारवाला दुकाने तोडण्यात आले. सेक्टर २४ तिरुपती आर्केड येथील ऑटो सेन्स यांनी केलेले अनधिकृत बांधकाम दुकानासमोरील रॅम्प पाडण्याचे काम करण्यात आले सेक्टर ३४ मानसरोवर स्टेशन रोड मानस बिल्डिंग समोरील अतिक्रमण झोपडपट्ट्या पाडण्यात आल्या. सेक्टर ३६ शिवसेना शाखा येथील भंगारवाले व इतर व्यवसायाकरता उभारलेले झोपडे जीसीबीद्वारे पाडण्यात आले. ऐश्वर्या हॉटेल सेक्टर १० येथील मोकळ्या प्लॉटवरील अतिक्रमण चिकन व्यवसाय व इतर धंदे यांनी उभारलेले झोपड्या जेसीब द्वारे पाडण्यात आल्या.

## देबाशीष चक्रवर्ती राज्याचे नवे मुख्य सचिव

हे लक्षात आल्यानंतर अखेर कुंटे यांना नियमाप्रमाणे निवृत्त व्हावेच लागले. म्हणूनच पर्यायाने राज्य सरकारला नव्या मुख्य सचिवांची नियुक्ती करावी लागली आहे. राज्याच्या मुख्य सचिव पदावर विराजमान झालेले देबाशिष चक्रवर्ती हे सन १९८६ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. चक्रवर्ती यांना आता एकूण तीन महिन्याचा कार्यकाळ मिळणार आहे. ते पुढील वर्षी फेब्रुवारी २०२२ मध्ये निवृत्त होत आहेत. राज्याच्या मुख्य सचिवरदावरून पायउतार झालेले सीताराम कुंटे हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विश्वासातील अधिकारी असल्याचे मानले जाते. याचा प्रत्यय त्यांच्या नव्या नियुक्तीवरून आला आहे. आता मुख्य सचिव पदावरून निवृत्त झालेल्या कुंटे यांना मुख्यमंत्री सचिवालयात प्रधान सल्लागार हे महत्त्वाचे पद देण्यात आले आहे.

## पनवेलमध्ये लालपरीला पर्याय काळी पिवळी

करण्याऐवजी त्यांना वेतनवाढ देण्याची तयारी दाखवली . यानंतर कामगार शुक्रवारपर्यंत हजर न झाल्यास त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले होते. त्याला प्रतिसाद देऊन रायगड जिल्ह्यात महाड आणि पेण आगारातील काही कर्मचारी कामावर हजर झाले असले, तरी पनवेल आगारातील कोणीही कर्मचारी हजर न झाल्याने येथून एकही गाडी सुटलेली नाही . रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण ही एसटी आगारे मुंबई विभागात येतात. मुंबई विभागातील आंदोलक विलिनीकरणा शिवाय माघार घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे या विभागातील सर्व आगारे अद्याप बंदच आहेत. येथून एकही गाडी सुटलेली नाही. शनिवारी पनवेल आगारातील आणखी काही कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आल्याने आतापर्यंत २७ कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई केली आहे. मात्र जरी लाल परी प्रवाशांच्या सेवेसाठी नसली तरी शासनाच्या माध्यमातून काळीपिवळी पिकअप व्यान पनवेल बस आगाराच्या बाहेर मोठ्या संख्येने तैनात केले असल्याने प्रवाशांची एक प्रकारे सोय झाली आहे .मात्र प्रवासी वाहतूक करताना त्यांना मर्यादा असल्याने प्रवाशांची एसटी शिवाय निश्चितच कुचंबणा होत असल्याचे दिसून येत आहे.

## शिक्षकाने केला अल्पवयीन मुलीचा विनयभंग

लैंगिक अपराधां पासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८, ९ (एफ)(एम), १० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराटे या करीत आहेत.


## महाराष्ट्र शासन

### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145) 222167

### ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ६८ सन २०२१-२०२२

खालील कामांसाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता.महाड, जिल्हा : रायगड पिनकोड नं.४०२३०१ दूरध्वनी क्रमांक (०२१४५) २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन फॉर्म फी भरुन, डाऊनलोड करून दि.०१/१२/२०२१ पासून ते दि.०३/१२/२०२१ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यंत खरेदी करावयाचे आहेत व दिनांक ०३/१२/२०२१ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, महाड यांचे कार्यालयात ऑफलाईन निविदा सादर करावयाच्या आहेत. भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दि.०३/१२/२०२१ रोजी १६.०० वाजता कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, महाड यांचे कार्यालयात ऑफलाईन उघडण्यात येतील.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | **रायगड किल्ल्यावरील राजसदर येथील मंडपाची उभारणी करणे, तालुका : महाड, जिल्हा : रायगड** | ९२७२८८ | १0000 | ३ दिवस | ६००/- |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल.
२) कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

जा.क्र. : मवि/लेशा/निविदा/३०८६
दिनांक : २९/११/२०२१

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वरदा-सुनील तटकरे कन्यादान योजनेचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

ग्रा.पंचायतीमधील नागरिकांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेल्या रोहे तालुक्यातील गोवे ग्रा.पंचायतीचे वतीने ता.२८ नोव्हें.रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून वरदा-सुनील तटकरे कन्यादान योजनेचा शुभारंभ सौ.वरदा तटकरे यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला आहे. ग्रा.पंचायतीचे या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होताना दिसत आहे.

शिरवली गावचे प्रतिष्ठित नागरिक संजय शेळके यांची सुकन्या .सौ.कां.स्नेहा संजीवनी संजय शेळके हिच्या विवाह सोहळ्या प्रित्यर्थ हळदी समारंभ प्रसंगी चिं.सौ.कां. स्नेहा हिला पहिले कन्यादान करण्याचे भाग्य ग्रा.पंचायतीला लाभले आहे.यावेळी चिं.सौ.कां.स्नेहा हिस शाल,पुष्पगुच्छ, पाच हजार रू.मानपत्र आदी देऊन या योजनेचे कन्यादान करण्यात आले.तसेच याच कार्यक्रमात जि.प.महिला व बालकल्याण मार्फत सोलर शेगडीचे वाटप शिरवली,मुठवली,. गोवे,खांब,नडवली आदी अंगणवाड्यांना करण्यात आले. महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेतलेले सरपंच महेंद्र पोटफोडे यांच्या हातून महिलावर्गासाठी घडलेले हे कार्य कौतुकास्पद असून भविष्यात या योजनेचा सर्वच मुलींना लाभ होणार आहे. तर याकामी मी माझ्या पद्धतीने लागणारे सर्वस्वी योगदान देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहिन अशाप्रकारचे अभिवचन यावेळी सौ.वरदा तटकरे यांनी ग्रा.पंचायतीला दिले.

# कोरोनाच्या नव्या विषाणूच्या लाटेला रोखण्यासाठी कोकण विभागातील प्रशासनाने तयारी करावी : विलास पाटील

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोरोना विषाणूच्या 'ओमायक्रॉन' या उत्परिवर्तीत विषाणूला अटकाव करण्यासाठी कोकण विभागातील यंत्रणांनी आतापासूनच दक्ष रहावे. विषाणूच्या नव्या प्रकाराला ओळखणारे चाचणी किट्स मिळण्याबाबत पाठपुरावा करावा. कोवीड चाचण्यांची संख्या वाढवावी. तसेच कोकण विभागातील ऑक्सिजन प्लान्टची क्षमता वाढविण्यावर भर द्यावा. कोविड काळात तयार करण्यात आलेले कोविड सेंटर पुन्हा सुरु करण्याचे निर्देश कोंकण विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी आज येथे दिले.

कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन या उत्परिवर्तीत विषाणूमुळे येणाऱ्या संभाव्य तिसऱ्या लाटेला अटकाव करण्यासंदर्भात आज विभागीय आयुक्त श्री. पाटील यांनी विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी संभाव्य लाटेच्या तयारीचा आढावा घेतला व पुढील काळात राबवावयाच्या उपाययोजनांबद्दल सूचना केल्या.

कोकण भवन येथे आयोजित या बैठकीस रत्नागिरीचे जिल्हाधिकारी डॉ.बी.एन.पाटील, सिंधुदूर्गचे जिल्हाधिकारी के.मंजुलक्ष्मी, पालघरचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, ठाण्याच्या प्रभारी जिल्हाधिकारी वैदेही रानडे, ठाण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भाऊसाहेब दांगडे, पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिध्दाराम



सालीमठ, रायगडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, रत्नागिरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.इंदूराणी जाखड, सिंधुदूर्गचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर, मुंबई शहरचे अप्पर जिल्हाधिकारी अरुण अभंग, उपायुक्त (महसूल) मकरंद देशमुख, उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, उपायुक्त (नियोजन) संजय पाटील, उपायुक्त (रोहयो) वैशाली चव्हाण, उपायुक्त (नगरपालिका प्रशासन) रविंद्र जाधव, उपायुक्त (करमणूक) सोनाली मुळे, उपायुक्त (पुर्नवसन) पंकज देवरे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले की, सध्या कोरोनाच्या नव्या उत्परिवर्तीत विषाणूचा धोका राज्यात येण्याची शक्यता आहे. त्यापार्श्वभूमीवर कोकण विभागातील प्रशासनाने आतापासून तयारी करावी. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपापल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या लसीकरणाचे प्रमाण १०० टक्के करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नवनवीन उपक्रम राबवावेत. लसीकरणाबाबत गावपातळीवर जनजागृती करावी. जिल्ह्यात लसींच्या पहिल्या व दुसऱ्या डोसचा तुटवडा होणार नाही, हे पहावे. विमानतळावरून येणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष द्यावे.

प्रवाशांच्या विलगीकरणासाठी नियोजन करावे. परदेशातून कोकणात मोठ्याप्रमाणात पर्यटक येतात त्यांच्या कोविड चाचण्यांबाबत विशेष नियोजन करावे. कोवीड रुग्ण वाढून पुन्हा लॉकडाऊन लागू नये, या निर्धाराने नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे यासाठी पुन्हा जनजागृती करावी. मास्क न वापरणारे, नियम तोडून अनावश्यक गर्दी करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देशही श्री. पाटील यांनी यावेळी दिले.

कोरोनाचा संसर्ग पुन्हा वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर विभागातील ज्या ठिकाणी ६ डिसेंबर रोजी ग्रामपंचायतीचे मतदान होणार आहेत. त्या ठिकाणी कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे, यासाठी नियोजन करण्याचे निर्देशही श्री. पाटील यांनी यावेळी दिले.

**ऑक्सिजन निर्मितीवर भर द्यावा**

कोकण विभागात सध्या किती ऑक्सिजन निर्मिती होत आहे. किती प्रमाणात ऑक्सिजनचा साठा उपलब्ध आहे, याचा आढावा विभागीय आयुक्तांनी यावेळी घेतला. त्याअनुषंगाने ऑक्सिजन निर्मिती व साठा वाढविण्याबाबत आराखडा तयार करण्याच्या सूचनाही विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्मार्टवर्क करण्याची संकल्पना यावेळी विभागीय आयुक्तांनी मांडली. सर्व महसूल कार्यालयांनी प्राथमिक तत्त्वावर ई-ऑफिस, ऑनलाईन पेन्शन प्रणालीसारख्या अद्यावत कार्यप्रणालींच्या वापरावर भर देण्याच्या सूचना श्री. पाटील यांनी यावेळी केल्या.

यावेळी विविध उपक्रमांच्या अहवालांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच जलजीवन अभियानाचा आढावाही यावेळी घेण्यात आला. महाआवास अभियानात कोकण विभागाने राज्यात प्रथम क्रमांकावर राहून उल्लेखनीय कामगिरी केल्याबाबत आयुक्तांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# पॅरा कब्बडी महाराष्ट्र संघाचे निवड शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन महाराष्ट्र आणि सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र याच्या मार्फत रविवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र (दिव्यांग) पॅरा कब्बडी संघाचे निवड शिबिर वांवढळवाडी, (चौक फाटा जवळ), ता.खालापूर, रायगड,,रामदास काईनकार यांच्या वीटभट्टी मैदानावर दोन सत्रात आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये बस सेवा संप सुरू असल्याने महाराष्ट्रातील ३० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यापैकी रमेश संकपाळ (कर्जत-रायगड), मंगेश म्हात्रे (पेण-रायगड), ओमकार महाडिक (महाड-रायगड), अक्षय निकम (रोहा-रायगड), राजन भरताव (मुंबई), राजा मोकल (पेण-रायगड), मुकुल खाडे (पेण-रायगड), रायसिंग वसावे (नंदूरबार), महेश वसावे (नंदूरबार), अशिफ शेख (सांगली) ज्योतिराम कदम (सांगली) विजय वळवी(नंदूरबार), यांची अजमेर राज्यस्थान येथे २७ते २९ डिसेंबर२०२१ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा कब्बडी स्पर्धा २०२१ साठी निवड करण्यात आली आहे.

यापैकी रमेश संकपाळ याची कर्णधार, मंगेश म्हात्रे यांची कोच कम खेळाडू, कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन महाराष्ट्र व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड, महाराष्ट्रचे सचिव शिवाजी पाटील यांची टीम व्यवस्थापक व संकल्प अपंग संघ मुंबई चे अध्यक्ष बाबाराव धोत्रे यांची सहाय्यक म्हणून निवड करण्यात आली आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कुलाबा दिव्यांग क्रिडा असो. महाराष्ट्र तथा सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रोहा रायगड महाराष्ट्रचे सचिव शिवाजी पाटील, कुलाबा दिव्यांग क्रिडा असो. महाराष्ट्र अध्यक्ष शशांक हिरवे, रायगड जिल्हाध्यक्ष कल्पेश तवले, फिजिओथेपिस्ट व सहव्यवस्थापक सुनिल पाटील, खालापूर तालुक्यातील दिव्यांग सामाजिक कार्यकर्ते मंगेश पार्टे, निवड समिती सदस्य रमेश संकपाळ, मंगेश म्हात्रे व ज्यांनी मैदान उपलब्ध करून दिले असे रामदास काईनकर आणि रवि काईनकर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले असे असोसिएशनचे सचिव शिवाजी पाटील यांनी सांगितले.



# मनसे उलवे तर्फे महिलांना मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे शहर जनसंपर्क कार्यालय येथे रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उलवे शहरध्यक्ष राहूल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित रायगड महिला जिल्हाध्यक्षा आदीतीताई सोनार यांचा सत्कार करण्यात आला.सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून स्नेहल जाधव (मनसे मुंबई) यांची उपस्थिती होती. त्यांनी यावेळी उलवे शहरातील महिला कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यक्रमास उलवे शहरातील महिला कार्यकर्त्या मोठ्या संखेने हजर होत्या.यावेळी सेविका महिला मंडळ उलवे अध्यक्षा सुनिता चि.म्हाञे, नर्मदा कि. मढवी, सुनंदा तु.कोळी,पदुबाई बा.पाटील, मनिषा रा.पाटील, वैशाली म.कोळी, धनश्री सु.कोळी, आऱती.स.पवार, आश्विनी रा.कोळी, नयना प्रे कोळी, सुर्वना भ.कोळी आदी महिला मान्यवर उपस्थित होत्या.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना सदर भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे वाटपपत्र करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | काळुंद्रे (संचिका क्र. ३५) | काळुंद्रे ४२/५० | १०/४<br>५०/२ | ०-७-०<br>०-४०-९ | ४०० चौ.मी. | मौजे - करंजाडे येथे भूखंड क्र. ७९ सेक्टर - ५अ, क्षेत्र - ३९९.८० चौ.मी. | **मूळ भूधारक काना उर्फ काना जानू म्हसकर (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती जनाबाई नारायण मते<br>२) श्री. दत्तात्रेय माया म्हस्कर | निरंक |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | ०-४७-९ | | | | |
| | | | | नोड- करंजाडे | | | | |
| १ | ४७ | वडघर १४ | ७२/१ते५+८+९/अ/२<br>७२/१ते५+८+९/अ/४<br>७३/अ/१ते३/३अ<br>७३अ/४अ | ०-२३-९<br>०-०४-०<br>०-१६-७<br>०-१४-४ | ९०० चौ.मी. | मौजे - करंजाडे भूखंड क्र. ३४ सेक्टर - २A, क्षेत्र - ८९९.४७ चौ.मी. | मा. न्यायालयीन वारस दाखल्यानुसार व तसेच हक्कसोडनुसार पात्र भूधारक -<br>१. श्री. योगेश चंद्रकांत केणी<br>२. श्री. रोशन चंद्रकांत केणी<br>३. श्री. चंद्रकांत काशिनाथ केणी<br>४. श्री. गणेश काशिनाथ केणी<br>५. श्री. सुरेश काशिनाथ केणी<br>६. श्री. शशिकांत जनार्दन केणी<br>७. श्रीमती साधना अंकुश पाटील | निरंक |
| | | वडघर १४ | ७०/५+६+८/अ | ०-४५-४ | | | | |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | १-०४-४ | | | | |
| १ | वडघर (संचिका क्र. ५६) | ६१ | ५८/५<br>७०/४<br>७५/५<br>७५/६<br>८१/८<br>१०३/७अ<br>१२०/३ | ०-१६-५<br>०-१५-४<br>०-०४-८<br>०-१३-९<br>०-०९-४<br>०-३९-५<br>०-०३-० | ९०० चौ.मी. | मौजे करंजाडे नोड, भूखंड क्र. ७८, से.- २A, क्षेत्र - ८९९.४७ चौ.मी. | संचिकेतील हक्कसोडनुसार तसेच मा. न्यायालयीन वारस दाखल्यानुसार पात्र ठरलेले<br>१. श्री. त्रिंबक जनार्दन भोईर<br>२. श्री. लहू जनार्दन भोईर<br>३. श्री. गणेश जनार्दन भोईर<br>४. श्री. अंकुश गजानन भोईर<br>५. श्री. उमेश कान्हा भोईर<br>६. श्री. भगवान माया भोईर<br>७. श्री. विजय यशवंत भोईर<br>८. श्री. मारुती नारायण भोईर<br>९. श्री. रघुनाथ नारायण भोईर<br>१०. श्रीमती गणुबाई दत्तात्रेय भोपी<br>११. श्रीमती गंगाबाई जोमा भगत | निरंक |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | १-०२-५ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अोसह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३२०/२०२१-२२



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालकांमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मालकाचे नाव : हिराबाई उर्फ भारती लक्ष्मण साळवी**
**पत्ता : मु.अडनाळे, पो.भानंगे, ता.तळा, जि.रायगड**
**गट नं.६४/२०/ब क्षेत्र ०.२८.५०, ०.१०.००=०३८.५०**
**आकार ०.०६ जमिनीचे प्रकार गवत**

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार वारसा हक्क, लीज, व्याज, पोटगी, वहिवाट (जाण्या येण्याचा मार्ग) इजमेंटरी या अथवा कोणतेही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य ते कागदपत्र पुराव्यासहीत पुरावे करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

**सही/-**
**रोशन विनायक म्हात्रे वै १**
**कोप्रोली, उरण,**
**रायगड, महाराष्ट्र ४१०२०६**
**मो.नं.९८८१६००८८८**



## जाहीर नोटीस

१) तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व अनुषंगिक कामासाठी आवश्यक असलेल्या मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेल्या जमिनीच्या संपादनाच्या संमती निवाडा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांनी जाहीर केला.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| ओवळे-५३+२६९ | १४ | २ | ०-३८-० |

२) सदर वर नमूद मिळकत ही माझे खालील नमूद प्रकल्पग्रस्त अशिल यांच्या मालकी हक्कातील, ताबे-कब्जातील आणि वहिवाटीतील होती.

१) कै.लक्ष्मण पुरुषोत्तम गायकवाड (मयत) यांचे वारसदार खालीलप्रमाणे :- (१/१) श्री.भास्कर लक्ष्मण गायकवाड, (१/२) श्रीमती.मथुरा काशिनाथ खांदेकर (१/३) श्रीमती.ताई रमेश जोशी, (१/४) श्रीमती.अश्विनी अशोक पाटील, (१/५) कु.सोनल अनिल गायकवाड, (१/६) कु.प्राची अनिल गायकवाड, (१/७) कु.मानसी अनिल गायकवाड-क्र.१/६ व १/७ यांची अज्ञान पालन करणार आई श्रीमती.गीता अनिल गायकवाड, (२) श्री.भानुदास शंकर गायकवाड, (३) श्री.गजानन शंकर गायकवाड, (४) श्रीमती.सिता बाळकृष्ण नाईक, (५) श्रीमती.आनंदी अंकुश दाभोलकर, (६) श्रीमती.यमुना रोहिदास गायकवाड, (७) श्री.सचिन रोहिदास गायकवाड, (८) श्रीमती.रुक्मिणी निवृत्ती गायकवाड, (९) श्री.कृष्णा निवृत्ती गायकवाड, (१०) श्री.अंकुश निवृत्ती गायकवाड, (११) श्रीमती.मंजुळा अर्जुन मायदे राहणार : मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड

३) वर नमूद संपादीत मिळकतीच्या बदल्यात नुकसान भरपाई पोटी खालील नमूद केलेला भूखंड माझे वरील नमूद अशिलांचे (प्रकल्पग्रस्त) नावे होणारा भाडेपट्टा करारनामा आणि भाडेपट्टा खता मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांनी दिनांक २४/११/२०१६ रोजीच्या वाटपपत्राद्वारे वाटप करण्यात आला. सदरहू भूखंडाचे सिडको दफ्तरी वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : पुष्पकनगर नोड (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | नोड | भूखंड क्र. | सेक्टर नं. | भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| ओवळे ५३+२६९ | पुष्पकनगर दापोली | २१ | १० | १०७० |

४) तसेच दिनांक २९/११/२०२१ च्या शुद्धीपत्रकांनुसार, सदर भूखंड, सिडको दप्तरी माझे वरील नमूद अशिलांच्या नावे आहे. सदरहू भूखंडामधील त्यांचा भाडेपट्टाधारक म्हणून हक्क, हितसंबंध निर्वेध आणि बोजाविरहित आहेत.

५) सदर भूखंडावर कोणतेही गहाण, कर्ज, दान, बक्षिस, लीज, पोटगी, मृत्यूपत्र, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, ट्रस्ट, कुळहक्क, इ. हक्क, हितसंबंध नाहीत. तसेच त्यांनी कोणाबरोबरही हस्तांतरण, विक्रीचा करार, साठेकरार, त्रिपक्षीय करार केला नाही. तसेच सदरहू भूखंडासंबंधात कोणत्याही न्यायालयात आणि अधिकारी यांचे समोर कोणत्याही प्रकारचा वाद प्रलंबित नाही. तसेच सदरहू भूखंड केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने कोणत्याही कारणासाठी संपादीत केलेला नाही.

६) माझे वरील नमूद अशिल यांचा वरील नमूद भूखंडामधील हक्क, हितसंबंध, सिडकोची परवानगी घेवून, त्यांना कोणासही हस्तांतरीत / विक्री करण्याचा पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार आहे.

७) अशा परिस्थितीमध्ये सदरहू भूखंडावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसाचे आत खालील पत्यावर पुराव्यासहीत लेखी कळवावे.

८) तरी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार एकवीस दिवसांच्या मुदतीत न आल्यास सदरहू भूखंडावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही असे समजण्यात येईल अथवा तो स्वेच्छेने सोडून दिलेला आहे असे गृहीत धरले जाईल. तसेच एकवीस दिवसांच्या मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. त्यामुळे माझे अशिल सदरहू भूखंड हस्तांतरीत / विक्री / व्यवहार त्यांच्या इच्छेनुसार सिडकोच्या परवानगीने करतील, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.२७/११/२०२१

**सही/-**
**ॲड.अमोल आर. बाबर**
**फ्लॅट नं.ए-११०३, हील व्ह्युव रेसिडेन्सी को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.५ आणि ६, सेक्टर ३० आणि ३१, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९७७३३६६७८३**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालकांमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मालकाचे नाव : श्रीमती.वैशाली पांडुरंग मोरे वै १**
**पत्ता : मु.अडनाळे, पो.भानंगे, ता.तळा, जि.रायगड**
**गट नं.७३/१२ क्षेत्र ०.६८.००, ०.२०.००=८८**
**आकार ०.३६ जमिनीचे प्रकार गवत, यापैकी ०.४०.००**

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार वारसा हक्क, लीज, व्याज, पोटगी, वहिवाट (जाण्या येण्याचा मार्ग) इजमेंटरी या अथवा कोणतेही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य ते कागदपत्र पुराव्यासहीत पुरावे करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

**सही/-**
**नामदेव महादेव साळवी**
**विधाने, पनवेल, महाराष्ट्र-४१०२०६**
**अडनाळे, पो.भानंग, ता.तळा, जि.रायगड-४०२१११**
**मो.नं.९८८१६००८८८**



मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६२१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२२

सौ.सुनीता कान्हा तरे
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५२१, किरवली, वरची आळी, तळोजे मजकूर,
तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.बाळ्या महादू भोईर यांची मुलगी असून कै.बाळ्या महादू भोईर रा.पडघेगाव, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.१२/०८/१९९५ रोजी मौजे : ढोंगऱ्याचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.बाळ्या महादू भोईर यांची पत्नी कै.लीलाबाई बाळ्या भोईर ह्या दि.१५/०४/१९९९ रोजी ढोंगऱ्याचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.बाळ्या महादू भोईर यांची आई कै.शेवंताबाई महादू भोईर ह्या दि.१९/०३/१९६३ रोजी ढोंगऱ्याचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. सदर अर्जदार यांनी कै.बाळ्या महादू भोईर यांच्या खालील मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|
| पडघे | १०२ | ६ | ०-३५-०० | ५.११ |

वरील अर्जदार हे कै.बाळ्या महादू भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्रुवाही करेल आणि ते जर कै.बाळ्या महादू भोईर यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२९/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## तोंडसुरे जवळ अपघात : महिला गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिघी पोर्ट' ते जळगाव या नव्याने होणाऱ्या ७५३ एफ' या राष्ट्रीय महामार्गाच्या नियोजित म्हसळा बायपास्ट (तोंडसुरे) जवळ दुचाकीचा अपघात होऊन अपघातात ४५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाल्याची घटना आज सायंकाळी ५.३० वा. घडली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, वारळ येथील ऋतीक पांडुरंग चाळके वय२१ रा.वारळ हा आपले जवळील MH 02 CK 8944 या पल्सर मोटर सायकलने वारळ हून म्हसळा शहराकडे येत असता तोंडसुरे गावा जवळ (नियोजित म्ह-सळा बायपास्ट)आला असता दुचाकीला कुत्रे आडवे आल्याने अप-घात होऊन दुचाकी वरील श्रीमती रेश्मा पांडुरंग चाळके वय ४१ (दुचाकी चालकाची आई) या दुचाकीवरून पडून गंभीर जखमी होवून मान, डोक्याला गांभीर दुखापती व रक्तस्त्राव झाल्याने ग्रामिण रुग्णालय म्हसळा येथे भरती केले. अपघाताचे स्वरूप पाहून डॉ. सोनाली जुन्नरकर यानी जखमी महीलेवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात पाठविल्याचे समजते. दुचाकीस्वार ऋतीक यानी अपघाताबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे म्हसळा पो-लीसाना ग्रामिण रुग्णालयात लिहून दिल्याचे ठाणे अमलदार किशोर जाधव यानी सांगितले




## चिरनेर येथे चांदायली आदिवासी वाडी आदिवासींना जातीचे दाखले वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

आदिवासी सामाजिक संस्था उरण यांच्या वतीने आदिवासी वाडी चिरनेर येथील चांदायली आदिवासींना जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

यावेळी चिरनेर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश फोफेरकर, किशोर भगत आदिवासी वाडीचे कार्यकर्ते रोशन कातकरी लक्ष्मी कातकरी दशरथ कातकरी आदी उपस्थित होते.या वेळी एकूण दीडशे जातीचे दाखले वाटप करण्यात आले.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# दुर्गम दुर्लक्षित भागासह तळागळात विकासगंगा पोहचविण्याचे काम राष्ट्रवादीने केले : खा.सुनिल तटकरे

## सुधागड तालुक्यात ५ कोटींच्या विकास कामांचे खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



जनतेचे मूलभूत प्रश्न व समस्या मार्गी लावण्याबरोबरच विकासात्मक दृष्टीने ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना मूलभूत व पायाभूत नागरिसेवा सुविधा पुरविण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष करीत आहे. सुधागड तालुक्यात विकासकामांची गंगा आणण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले व यापुढेही करीत राहील अशी ग्वाही खासदार सुनिल तटकरे यांनी दिले. विकासकामांच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा रथ सर्वांच्या पुढेच असा दावा खा. सुनिल तटकरे यांनी केला.

सुधागड तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी तालुक्याला नेहमीच भरीव निधी उपलब्द करून दिला आहे, यापुढे देखील निधी कमी पडू देणार नाही असे खा.तटकरे यांनी आश्वाशीत केले. सुधागड तालुक्यातील तब्बल ५ कोटींच्या विविध विकासकामांचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी खा.तटकरे बोलत होते.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत १ कोटी १ लक्ष १४ हजार ५९३ रुपये रक्कमेचा पेडली नवघर रस्ता आणि कळंब ते कळंब धनगर वाडा रस्ता तसेच ३ कोटी ८८ लक्ष ५० हजार रुपये रक्कमेच्या कळंब ते कळंब ठाकूरवाडी रस्त्यावरील पुलाचे बांधकाम असे तालुक्यातील तीन मोठ्या विकासकामांचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यापुढेही विविध विकासकामांना गती देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून करणार असल्याचे तटकरे यावेळी म्हणाले.यावेळी गीताताई पालरेचा यांनी सांगितले की सुधागड तालुक्यातील दुर्गम दुर्लक्षित भागात, आदिवासी वाड्यापाड्यांवर विकास पोहचविण्याचे काम राष्ट्रवादीने केलेय. पायाभूत व नागरी सेवा सुविधा पुरविण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच आघाडीवर राहिला आहे.

रस्ते,पुल, नळ पाणीपुरवठा, समाजमंदिर आदी विकासकामांना राष्ट्रवादी काँग्रेसने प्रथम प्राधान्य दिले. विकासात्मक दृष्टीकोन ठेऊन सुधागड तालुक्याचा कायापालट करण्याच्या भूमिकेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते अविरतपणे कार्यरत रा-हणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला रायगड जिल्हा अध्यक्षा गीताताई पालरेचा यांनी सांगितले.

सुधागड तालुक्यातील मोठ्या प्रमाणात विकास कामे आणण्याचे कार्य खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला रायगड जिल्हा अध्यक्षा गीता पालरेचा या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करत आहेत. विकासकामात राष्ट्रवादी अव्वल स्थानी राहिली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी रायगड जिल्हा अध्यक्ष वसंत ओसवाल, महिला अध्यक्षा गीता पालरेचा, तालुका अध्यक्ष रमेश साळुंखे, तालुका युवक अध्यक्ष संदेश शेवाळे, पंचायत समिती सदस्य साक्षी दिघे, पाली शहर अध्यक्ष अभिजित चांदोरकर, सुनिल राऊत यशवंत पालवे, प्रकाश आवास्कर, शेखर डोंगरे, सुरेश धनवी दिपक पवार, नितीन परब व किरण खंडागळे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुरुड आगारातून बस काढण्याचा प्रयत्न : विलिनीकरणाच्या मुद्यावर कर्मचारी ठाम

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनात विलिनीकरणासाठी सुरू असलेल्या एस टी कर्मचाऱ्यांच्या संपाला आज बावीस दिवस झाले असून मुरुड आगारातून बस काढण्याचा प्रयत्न झाला तरी अद्यापही विलिनीकरणाच्या मुद्द्यावर कर्मचारी ठाम आहेत.

मुरुड आगारातून आगारातील चालक व वाहक यांचा वापर करून आगार व्यवस्थापक व स्थानक प्रमुख यांनी दि.२९ नोव्हेंबर रोजी बऱ्याच वेळा बस बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्याकरीता मार्ग तपासणी पथक - रायगड तसेच पोलिस प्रशास-नास पाचारण केले.मात्र आगारात एक वाहक प्रकाश दांडेकर हे काही दिवसांपूर्वी संपात असताना संपकऱ्यांची दिशाभूल करुन कामगिरीवर हजर झाले व त्यानुसार काही दिवस त्यांना प्रशास-नाने नुसते बसून, काही कामगिरी न देता दिवस भरुन देण्यात आले.परंतु विभागीय कार्यालयातील अधिकारी यांनी आगार व्यवस्थापकांना बदलीची दिलेली तंबी व प्रवासी संघटनेचा दणका याचा विचार करून हजर असलेल्या वाहका बरोबर मार्ग तपासणी पथकातील चालकाला कामगिरी देऊन अखेर एक बस दि.८ नोव्हेंबर २०२१ नंतर बावीस दिवसांनंतर मुरुड - अलिबाग या मार्गावर विभागीय कार्यालयाकडून मागविण्यात आलेल्या चालकाच्या साहाय्याने पोलिस बंदोबस्तात व मार्ग तपासणी पथकासमवेत बस मार्गस्थ केली.

याबाबत कर्मचाऱ्यांबरोबर संपर्क साधला असता मुरुड आगारातील कर्मचाऱ्यांनी एस. टी. महामंडळाचे राज्य शास-नात विलिनीकरण करावे.या मागणीसाठी त्यांचे आत्महत्या केलेल्या एकुण ४५ सहकाऱ्यांबद्दल दुखवटा पाळून कामबंद आंदोलन पुकारले आहे.मात्र परिवहन मंत्री अनिल परब यांनी मागणी नसताना सुद्धा वेतन वाढिची फसवी घोषणा केली. त्याबाबत आजतागायत कोणताही अध्यादेश,शासन परिपत्रक काढलेले नाही.म्हणूनच जो पर्यंत शासनामध्ये विलिनीकरण होत नाही तोपर्यंत आमचा दुखवटा कायम चालू राहील.असा दृढ निर्धार एस टी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला असून संपकऱ्यांमध्ये कोणतीही फुट पडलेली नाही.

मात्र फूट पडलेली दाखविण्यासाठी विभागीय कार्यालयाकडून चालकाची मागणी करुन पोलिस बंदोबस्तात बस आगारातून बाहेर काढण्यात आल्याची माहिती संपकरी कर्मचाऱ्यांनी यावेळी दिली तसेच इच्छूक कर्मचाऱ्यांना कामावर जाण्या पासून आपण रोखत असल्याबाबत संपकरी कर्मचाऱ्यांना विचारले असता आम्ही सदर दुखवट्या मध्ये स्वत: स्वयंस्फुर्तीने आमच्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत करीत असून आम्ही कोणालाही कामावर जाण्या पासून रोखलेले नाही.असे संपकरी कर्मचाऱ्याकडून सांगण्यात आले.यावेळी महाड,माणगांव, श्रीवर्धन, रोहा तसेच पेण विभागीय कार्यशाळेतील जे जे कर्मचारी वेतन वाढ व निलंबनाच्या भितीने पुन्हा कामगिरीवर हजर झाले होते ते सर्व कर्मचारी दि.२९ नोव्हेंबर पासून पुन्हा संपात सामील झाले असल्याचे व आता पर्यंत मुरुड आगारातील ३२ कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक; ५४८ वाहनांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाशी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) कार्यालयाच्या वायुवेग पथकाने गेल्या सहा महिन्यांत रस्त्यावरुन (ओव्हर लोड) क्षमतेक्षा जास्त वजनाची वाहतूक करणाऱ्या ५४८ वाहनांवर कारवाई केली असून, या वाहन चालकांकडून १ कोटी ४७ लाख ३२ हजार ५०० रुपये इतकी दंड वसुली केली आहे.

व्यावसायिक वाहनांना मालाची वाहतूक करण्यासाठी परिवहन विभागाने वजन क्षमता आखून दिली असून, त्याप्रमाणे मालाची वाहतूक करणे बंधनकारक आहे. मात्र, नवी मुंबई शहरात परिवहन विभागाचे नियम पायदळी तुडवत (ओव्हर लोड) क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या वाहनांची मोठी वाहतूक सुरु असते. यामध्ये खडी, वाळू आणि डेब्रिज असलेल्या वाहनांचा भरणा अधिक असतो. अतिक्षमतेने वजन भरल्याने वाहनांचा अपघाता होण्याची शक्यता जास्त असते. दुसरीकडे न्यायालयाने देखील क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे वाशी आरटीओ कार्यालयाच्या वायुवेग पथकांनी क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. एप्रिल-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ या सहा महिन्यात एवूण क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या ५४८ वाहनांवर वाशी आरटीओ कार्यालयाच्या वायुवेग पथकांनी कारवाई केली असून, या वाहन चालकांकडून १ कोटी ४७ लाख ३२ हजार ५०० रुपये इतकी दंड वसुली केली आहे. क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे सत्र यापुढेही सुरुच राहणार आहे, अशी माहिती वाशी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली.

# म्हसळ्यात राष्ट्रवादी विरोधात सेना -काँग्रेस-शेकाप आघाडी, हालचालींना वेग

## विद्यमान नगरसेवकांमधून ९ ते १० कामचुकार नगरसेवकांना मिळणार डच्चू

**दै.रायगड नगरी । म्हसळा**


रायगड जिल्ह्यातील राजकारणाचे मुख्य केंद्रबिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हसळा नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विरोधात सेना -काँग्रेस-शेकाप युती होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून शहरात अश्या हालचालीना वेग आल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून एकत्रित येण्याची चर्चा शहरात नाक्यानाक्यावर सुरु असून तशा प्रकारच्या हालचाली सुरु असल्याचे दिसून येत आहे.

म्हसळा याठिकाणी पूर्वी ग्रामपंचायत होती. सन २०१५ मध्ये म्हसळा हे तालुक्याचे ठिकाण असल्याने तालुक्याच्या मुख्यालय ठिकाणी नगरपंचायत व्हावी हे धोरण शासनाने अंमलात आणून सन २०१५ मध्ये रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा,तळा,पोलादपूर,खालापूर या पाच तालुक्यात नगरपंचायत अस्तित्वात आली. नगरपंचायतीच्या निवडणुका निवडणूक आयोगाने जाहीर करून दि.२४ नोव्हेंबर २०२१ सायंकाळ पासून आचारसंहिता नगरपंचायत हद्दीत लागू केली आहे.म्हसळा नगरपंचायतीची पहिलीच सार्वत्रिक निवडणूक १० जानेवारी २०१६ रोजी झाली होती. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सर्वाधिक जागा जिंकून नगरपंचायतीवर एकहाती सत्ता मिळविली होती.त्यानंतर गेल्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत म्हसळा नगरपंचायतीत राजकीय घडामोडी घडल्या. यामध्ये काही सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला.या पक्षांतराची त्याकाळात जोरदार चर्चा म्हसळा नगरीसह रायगड जिल्ह्यात सर्वत्र सुरु होती. पाच वर्षानंतर पुन्हा म्हसळा नगरपंचायतीचे वार्ड क्र.बदलले असून नुकत्याच पडलेल्या नगरसेवक पदाच्या आरक्षणामुळे माजी नगरसेवकांपैकी ९ ते १० जणांचे पत्ते कट होणार असल्याचे संकेत आहेत..त्यामुळे म्हसळा नगरपंचायतीत आता नवीन चेहऱ्यांना संधी मिळणार आहे.

म्हसळा नगरपंचायतीची सन २०२१ ची निवडणूक काही दिवसांच्या अंतरावर लागल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या नेतेमंडळी व कार्यकर्त्यांच्या जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. या नगरपंचायतीत १७ वार्ड असून १७ नगरसेवक पदाची संख्या आहे.यासाठी १७ वार्डांतून पडलेल्या आरक्षणाप्रमाणे इच्छुक उमेदवारांची चाचपणी सर्व राजकीय पक्षांकडून केली जात आहे.इच्छुकांच्या मुलाखती काही पक्षांनी सुरु केल्या आहेत.यावेळेस कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे सत्ता जाऊ नये यादृष्टीने विरोधी शिवसेना, काँग्रेस,शेकाप हे सर्व पक्ष एकत्र येऊन म्हसळा विकास आघाडी तयार करून एकत्रित लढण्याच्या दृष्टीने विचाराधीन असून तशा प्रकारच्या हालचाली सुरु झाल्याचे दिसत आहे.विरोधी पक्षाचे नेतेमंडळी व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गेल्या पाच वर्षात नगरीचा काय विकास साधला असे बोलत आहेत.तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतेमंडळी व कार्यकर्ते हे आम्ही गेल्या पाच वर्षात नगरीतील विविध विकासकामे मार्गी लावली असून जनता जनार्दन याची पोचपावती आम्हाला निश्चितच देईल असे बोलत आहेत.म्हसळा नगरपंचायत निवडणुकीसाठी वार्ड क्र.१ मध्ये अनुसूचित जमाती महिला, वार्ड क्र.२ मध्ये नामाप्र महिला, वार्ड क्र.३ मध्ये सर्वसाधारण महिला, वार्ड क्र.४ मध्ये अनु. जाती महिला, वार्ड क्र.५ मध्ये सर्वसाधारण महिला ,वार्ड क्र.६ मध्ये सर्वसाधारण , वार्ड क्र.७ मध्ये ना माप्र , वार्ड क्र.८ मध्ये नामाप्र महिला, वार्ड क्र.९ मध्ये नामाप्र,वार्ड क्र.१० मध्ये सर्वसाधारण , वार्ड क्र. ११ मध्ये सर्वसाधारण महिला , वार्ड क्र.१२ मध्ये सर्वसाधारण , वार्ड क्र.१३ मध्ये सर्वसाधारण महिला, वार्ड क्र.१४ मध्ये सर्वसाधारण ,वार्ड क्र.१५ मध्ये सर्वसाधारण महिला , वार्ड क्र.१६ मध्ये सर्वसाधारण , वार्ड क्र.१७ मध्ये सर्वसाधारण असे आरक्षण पडले असून या निवडणुकीसाठी दि.१ ते ७ डिसेंबर या कालावधीत दि.४ व ५ शनिवार व रविवार सुट्टीचे दिवस सोडून इच्छुक उमेदवारांना आपले नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत.

या निवडणुकीसाठी दि.२१ डिसेंबर रोजी मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी दि.२२ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.एकंदरीत म्हसळा नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक चुरशीची होऊन अनेक वार्डांतून धक्कादायक निकाल लागणार हे मात्र तितकेच खरे आहे.

# विविध मागण्यांसाठी ७ डिसेंबर पासून चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे आमरण उपोषण



**दै.रायगड नगरी । उरण**

चाणजे शेतकरी संघर्ष समितीने शासन दरबारी अनेक वेळा कायदेशीर, शांततेच्या मार्गाने पत्रव्यवहार करून देखील शासनाने शेतकऱ्यांच्या महत्वाच्या समस्यांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले.

चाणजे हद्दीतील अतिक्रमण तसेच समुद्राचे पाणी व खारफुटीचे अतिक्रमण झालेल्या शेतजमिनीची शासनाने नुकसान भरपाई द्यावी अन्यथा संबंधित जमीन संपादित करावी.साकव वर हाईट गेज पूर्ववत करणे, साकवची प्लॅप गेट कायम स्वरूपी ठेवणे. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आदी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी तसेच शेतकऱ्यांवर, स्थानिक भूमीपुत्रावर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून दि ७/१२/२०२१ पासून सिडको कार्यालय, द्रोणागिरी येथे आमरण उपोषण करण्याचा इश-ारा अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यासाठी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव महसूल विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष मुंबई, जिल्हाधिकारी रायगड, तहसीलदार उरण, भूमी व भूसंपादन अधिकारी सिडको नवी मुंबई, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावा शेवा बंदर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण पोलीस ठाणे आदी ठिकाणी अविनाश म्हात्रे यांनी पत्रव्यवहार केला असून सदर मागण्या त्वरित मान्य झाल्या नाही तर मंगळवार दि ७/१२/२०२१ पासून बाधित शेतकऱ्यांद्वारे सिडको कार्यालय द्रोणागिरी येथे मरे पर्यंत उपोषण करण्यात येईल. व होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील असा स्पष्ट इशारा चाणजे शेतकरी संघर्ष समितीने प्रशासनाला दिला आहे.

# रेल्वे उपनगरीय क्षेत्राची मर्यादा रोहा व अलिबाग पर्यंत वाढवा : प्रवासी संघ, पनवेल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एमएमआरडीएने आपल्या कार्यक्षेत्राची व्याप्ती खोपोली पर्यंत वाढवली आहे आणि रोहा पर्यंत वाढविण्याचा विचार असल्याचेही कळते. मुंबई, नवी मुंबई, पनवेल व त्याची उपनगरे यामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्येचे प्रमाण वाढते आहे. अंतरराष्ट्रीय विमानतळही पनवेल जवळच उभारला जात आहे. त्यामुळे खाजगी व सार्वजनिक वाह-तूक व्यवस्थेवरील ताण वाढत आहे.

त्यामुळे महाराष्ट्र शासनाने व मध्य रेल्वे, कोंकण रेल्वे यांनी रोहा पर्यंतची प्रवासी रेल्वे वाहतूक उपनगरीय क्षेत्र जाहीर करून लोकसेवा किंवा मेमू सेवा सुरू करणे काळाजी गरज आहे, असे मत पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष व आयुर्वेदाचार्य डॉ.भक्तिकुमार दवे यांनी व्यक्त केले आहे. या बाबत बोलतांना प्रवासी संघाचे कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य यांनी या संबंधात संबंधितांशी चर्चा करून व पत्रव्यवहार चालू असल्याचे सांगितले आहे. हा विषय केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या प्रवासी सुविधांविषयी संसदिय समिती समोर मांडण्याचेही प्रवासी संघाने ठरविले आहे. या मध्ये पेण, अलिबाग, रेल्वेची प्रवासी सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# एकता कॅटॅलिस्टच्या वर्धापन दिन सोहळ्या निमित्त टाऊनशिप येथे भव्य कामगार व ओबीसी मेळावा

**दै.रायगड नगरी । उरण**

एकता कॅटॅलिस्टच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमीत्त भव्य कामगार मेळावा व ओबीसी मेळावा मल्टीपरपज हॉल जेएनपीटी टाऊनशिप येथे आयोजीत करण्यात आला होता. यावेळी कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांची ओबिसी व्हीजे -एनटी जनमोर्चा संघटनेच्या महिला प्रदेशाध्यक्षापदी निवड झाल्याबद्दल कामगार व विवीध संघटनांच्या पदाधीकार्यांनी सत्कार केला. या मेळाव्याचे आयोजन कोकण श्रमिक संघ बी.एम.टी.सी.कर्मचारी पुनर्वसन समिती आणि ओबिसी व्हीजे -एनटी जनमोर्चा संघटना या तिन्ही संघटनांनी संयुक्तपणे आयोजीत केल होतं.या मेळ्याव्याचे आध्यक्षस्थान ओबिसी व्हीजे -एनटी जनमोर्चा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी भूषविले.

या मेळाव्याला उरण,पनवेल,नवीमुंबई,ठाणे ,मुंबई,कल्याण आदि महाराष्ट्रातील विवीध भागातून असंख्य दलीत ,मच्छिमार, स्थानीक भूमिपूत्र कामगार व ओबीसी बांधव उपस्थीत होते. या कार्यक्रमात कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांच्या एकता कॅटॅलिस्ट मार्फत भगवान माळी ,संजीवन म्हात्रे,देवीदास थळे, यांना नवरत्न कॅटॅलीस्ट पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. यावेळी बोलताना कामगारनेत्या श्रुती म्हात्रे म्हणाल्या प्रस्थापीत सामाजाने जाणूनबूजून बाजूला ठेवलेला समाज म्हणजे वंचीत. आज देशात आसे ८० टक्के वंचीत असून फक्त २० टक्के प्रस्थापित देशावर हुकूमत करत आहेत.अशा वंचीतांना न्याय मिळवून देण्यासाठी माझे बाबा कामगारनेते शाम म्हात्रे यांनी आयुष्य खर्ची घातला.त्यांचा आधूरा राहीलेले काम ,त्यांचे स्वप्न मि पूर्ण करेन आणी देशातील वंचीतांना न्याय देण्याचे काम करीन

या मेळाव्यात व्यासपिठावरील ओबिसी व्हीजे -एनटी जनमोर्चा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप, ओबिसी व्हीजे -एनटी जनमोर्चाचे राष्ट्रीय महासचीव बाळाजी शिंदे , हिंद मजदूर सभेचे राष्ट्रीय आध्यक्ष कामगारनेते ॲड संजय वढावकर, बेलधार भटका समाजाचे राज्य आध्यक्ष राजूभाऊ साळूंके, नारायण खडगे,ॲड शेरेकर मॅडम, ओबीसी राज्य संघटक अनिल पवार ओबिसी व्हीजे -एनटीचे जिल्हा आध्यक्ष ज्ञानदेव पवार, सुरेश कांबळे, विनायक वाजपेयी, विष्णू कुर्हाडे, शौकतभाई तांबोळी, आर फाउंडेशनचे बबन कांबळे, सदानंद भोपी,रामनाथ पंडीत, यांनी उपस्थीत कामगारांना मार्गदर्शन केले.